**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक २८/०२/२०२४**

आरोपी लोकसेवक- श्री.बंडू बाबूसिंग पवार, वय 39 वर्षे, पद- वरिष्ठ लिपीक, नेमणुक-शासकिय वैद्यकिय महाविदयालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांना 3000/- रुपये लाचेची रक्कम मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे बेगमपुरा, गु.र.नं. 58/2024 कलम 7 भ्र. प्र. अधिनियम. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री.बंडू बाबूसिंग पवार, वय 39 वर्षे, पद- वरिष्ठ लिपीक, नेमणुक-शासकिय वैद्यकिय महाविदयालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर रा. न्यू पहाडसिंगपुरा, सैनिक कॉलनी, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/-रुपये. तडजोडी अंती 3000/- |
| लाच स्विकृती रक्कम | | नाही. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. अमोल धस, पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार हे शासकिय वैद्यकिय महाविदयालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे चतुर्थ श्रेणी कामगार आहेत ते चार महिने डयुटीवर गैरहजर होते. दिनांक 16/01/2024 रोजी त्यांनी डयुटीवर हजर होण्याकरिता अर्ज दाखल केला असता डयुटीवर हजर होण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री. बंडू पवार यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 17/01/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. बंडू पवार यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष तडजोडी अंती 3000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे वेळोवेळी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. बंडू पवार यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही. आलोसे बंडू पवार यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन बेगपुरा छत्रपती संभाजीनगर शहर येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गु .र.नं. 58/2024 कलम 7 भ्र.प्र.अधिनियम प्रमाणे दाखल केला आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल धस यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार शिरीष वाघ, सुनिल पाटील, चालक पो.अं.सी.एन. बागुल, यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777





( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.